जावक क्रमांक ३५५३ / २०२४
जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा
दिनांक :— ०५/०४/२०२४

## —: फे र नि वि दा :—

जिल्हा न्यायालय,सातारा या न्यायालयाच्या ग्रंथालयामधील जुनी,जीर्ण खराब झालेली पुस्तके नाश करावयाची असल्याने विकणेसाठी उपलब्ध आहे. ती जीर्ण पुस्तके ज्या रद्‌दी खरेदीदारांना विकत घेणेची आहेत त्यांनी त्यांच्या निविदा मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, सातारा यांचे नावे सिलबंद लखोटा तयार करून त्यावर रद्‌दी खरेदीकरीता निविदा असा स्पष्ट उल्लेख करून **दिनांक १६/०४/२०२४** रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत अगर त्याआधी पोहोचतील अशा बेताने जिल्हा व सत्र न्यायालय, सदरबझार, कोरेगाव रोड सातारा या पत्यावर पाठवावे. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सिलबंद लखोटयावर निविदादारांचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच हि निविदा mahsatdc@mhstate.nic.in या संकेत स्थळावर पाहू शकता.

**अ.** ज्याची निविदा मंजूर करणेत येईल त्यांनी जुनी,जीर्ण पुस्तके जिल्हा न्यायालयाच्या ग्रंथालयातून स्वखर्चाने नेणेची आहेत.

**ब.** निविदा स्वीकारल्यानंतर कार्यालयातून जुनी,जीर्ण पुस्तके ०३ दिवसांचे आत उचलणेची आहे.

**क.** पुस्तके उचलण्यापूर्वी वजनाप्रमाणे होणारी रक्कम लगेचच त्याच दिवशी सेल्स टॅक्स व जनरल टॅक्ससह भरणेची आहे.

**ड.** सर्व प्राप्त निविदा मा.खरेदी समिती जिल्हा न्यायालय, सातारा यांचेपुढे उघडणेत येतील. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे बाबतचे सर्व अधिकार स्थापन केलेल्या समितीस असतील.

**इ.** निविदादारांनी निविदा उघडतेवेळी मा.खरेदी समिती जिल्हा न्यायालय, सातारा यांचे समक्ष हजर रहाणे आवश्यक आहे.

आदेशावरून
५/४/२०२४.
प्रबंधक
जिल्हा न्यायालय,सातारा

**प्रत :**

**१.** सहा.अधिक्षक वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, सातारा यांना जिल्हा न्यायालय इमारती मधील सर्व सूचना फलकांवर आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सातारा यांच्या फलकावर प्रसिध्द करून त्याचा अहवाल सादर करणेकामी एक ज्यादा प्रत रवान

**२.** संगणक कक्ष, जिल्हा न्यायालय सातारा कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेसाठी.